## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची जबानी

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | विनोद भिमराव जाधव, |
| माझे वय | – | ४९ वर्षे, |
| व्यवसाय | – | पो.हे.कॉ/९९३ |
| नेमणुक | – | स्थानिक गुन्हे शाखा, नंदुरबार, ता. जि. नंदुरबार |

**सरतपास अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी वकील श्री. आर. डी. बिऱ्हाडे यांचे मार्फत.**

**१.** दि. ११/१२/२०२५ रोजी माझी नेमणुक पो.हे.कॉ म्हणुन नंदुरबार शहर पोलीस ठाणे येथे होती. त्यादिवशी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात मी, पी.एस.आय. छगन चव्हाण, मराठे, पो.कॉ. वसावे, महिला पो.कॉ. वाघमोडे व स्थानिक गुन्हे शाखेचे पी. एस. आय विकास गुंजाळ व इतर पोलीस कर्मचारी असे हजर होते. त्यावेळी पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, रज्ज़ाक पार्क जवळ आर.बी.आय पार्क येथे शेख कमर शेख अब्बास यांच्या पत्र्याच्या शेडमध्ये गोवंश जनावर कत्तलीकरिता बांधुन ठेवलेले आहे. त्यांनी आम्हाला त्याबाबत कारवाई करण्यास सांगितले. त्यानंतर मी दोन पंचांना बोलावुन घेतले व त्यांना माहिती सांगितली. त्यानंतर आम्ही पोलीस स्टाफ व पंच असे खाजगी वाहनाने रज्ज़ाक पार्क जवळ, बीफ मार्केट जवळ गेलो. आमच्यासोबत प्रिंटर, लॅपटॉप व पंचनाम्याचे साहित्य होते. आम्हाला बातमीच्या ठिकाणी शेख कमर शेख अब्बास मिळुन आला. त्यांना आमची व पंचांची ओळख करुन दिली. त्याच्या समक्ष दुपारी १.३० वाजता त्याच्या शेडची पाहणी केली असता, तेथे एक काळया रंगाचा दोन शिंग असलेला बैल एका लोखंडी कडीला पुरेशी हालचाल करता येणार नाही असे बांधुन त्याच्या चारापाण्याची व्यवस्था न करता कत्तलीसाठी बांधुन ठेवल्याचे दिसुन आले.

**२.** त्यानंतर नवाब कुरेशी याच्या घराजवळ निंबाच्या झाडाला एक काळया रंगाची दोन शिंग असलेली गाय आखुड व पुरेशी हालचाल करता येणार नाही अशा स्वरुपात कत्तलीसाठी बांधुन ठेवल्याचे आम्हाला दिसुन आले. सदर दोन्ही गोवंश जनावरे शेख कमर शेख अब्बास यांचे असल्याचे त्यांनी आम्हाला सांगितले. सदर जनावरांसंबंधी कागदपत्रांची विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. मी सदर घटनेसंबंधी पंचनामा केला. (सरकारी वकीलांनी साक्षीदारास पंचनामा दाखविला.) आता मला दाखविलेला पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. तसेच त्यावर आरोपीची व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर पंचनाम्यास **निशाणी पी१** देण्यात येते.) त्यानंतर पोलीस कॉन्स्टेबल वसावे यांनी आरोपी विरुद्ध पोलीस ठाण्यात येवुन फिर्याद दिली होती. माझा जबाब घेण्यात आला होता. मी आरोपीला ओळखतो. आरोपी न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एम. पी. चौधरी यांचे मार्फत.</u>**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, रज्ज़ाक पार्क व आर.बी. आय पार्क हा दाट लोकवस्तीचा परिसर आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर भाग शहर पोलीस ठाण्यापासुन दुचाकीने १० मिनीटाच्या अंतरावर आहे. सदर भाग शहर पोलीस स्टेशन पासुन अंदाजे ३ किमी अंतरावर आहे. कोणत्या खाजगी वाहनाने गेलो त्याचा नोंदणी क्रमांक अथवा वर्णन सांगु शकत नाही.

**प्रश्न –** तुम्ही केलेल्या पंचनाम्यामध्ये घटनास्थळाचा नकाशा दर्शविण्यात आलेला नाही अथवा घटनास्थळाची परिस्थीती दर्शविण्यात आलेली नाही ?
**उत्तर –** मी घटनास्थळ पंचनामा केला नसुन कारवाई पंचनामा केलेला आहे.

**४.** घटनास्थळावरील पत्रयाचे शेड कोणाच्या मालकीचे होते याबाबत मी वैयक्तीक चौकशी केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, शहर पोलीस ठाण्यातुन रज्ज़ाक पार्क येथे जायचे असल्यास दाट रहदारीच्या रस्त्यावरुन जावे लागते. प्रिंटर व लॅपटॉप कोणत्या कंपनीचे होते याचे वर्णन मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर जाण्यासंबंधी मला वरिष्ठांनी लेखी आदेश दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, हेमंत पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, शहर पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखाचे कार्यालय वेगवेगळया ठिकाणी आहेत. हे म्हणणे खरे नाही की,मी कोणत्याही पंचांना बोलाविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खाजगी वाहनाने बातमीच्या जागेवर कधीही गेलेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, पत्र्याच्या शेडमध्ये एक बैल व निंबाच्या झाडाजवळ एक गाय मिळुन आल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणताही पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या ताब्यातुन कोणतेही गोवंश जनावरे मिळुन आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी पी१ कडील पंचनाम्यावर आरोपीच्या सहीच्या ठिकाणी आरोपीचे नाव नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही आरोपीची पंचनाम्यावर सही घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचांची व आमची ओळख आरोपीला करुन दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्ठांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHANUPRATAP BASANTSINGH CHOUHAN
Date: 2026.07.15 15:42:55 +0530

नंदुरबार
दि. १५/०७/२०२६

भानुप्रताप ब. चौहान
प्र. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी
नंदुरबार